ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 302-M (RS)**

**Code No. : 302-M (RS)**

**ಶಿಕ್ಷಣ**

**EDUCATION**

# ಮೂಲ ಪರಿಕಲ್ಪನೆಗಳ ಪರಿಚಯ

# INTRODUCTION TO BASIC CONCEPTS

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 06. 06. 2017 ]

Date : 06. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**भाग - I**

खालील प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी अति योग्य पर्याय निवडा आणि उत्तर उत्तरपत्रिकेमध्ये लिहा. सर्व प्रश्न सक्तीचे आहेत : $10 \times 1 = 10$

1. जगाच्या स्वरूपाविषयी विस्तृत विश्वास आणि मूल्य यांच्या पद्धतीला असे म्हणतात.

   (A) तत्व (B) तत्वज्ञान

   (C) युक्तिवाद (D) अभ्यासक्रम.

2. खालीलपैकी कोणती विधाने ही ज्ञानाच्या कोणत्या प्रकाराविषयी सत्य आहेत ?

   I. काल्पनिक ज्ञान हे आपले जीवन जगण्यासाठी कौशल्याशी संबंधीत आहे.

   II. परज्ञानात्मक ज्ञान हे स्वतःच्या आकलन आणि जागृतीसाठी.

   III. क्रियात्मक ज्ञान हे मूलभूत संकल्पना आणि विषय आधारित तत्वांचे आकलन आहे.

   (A) I आणि II (B) II आणि III

   (C) फक्त II (D) फक्त IV.

3. शालेय शिक्षणाची परिणामकारी आणि उपयुक्तता ही आहे.

(A) बालकाच्या शारीरिक आणि सांस्कृतिक परिसराचे मूळ आहे

(B) पालक, शिक्षक आणि समुदाय यांच्यातील देवाण घेवाणीमूळे पोषक बनते

(C) बालकाच्या जीवनाची संवेदना आणि सामर्थ्यांचा विकास घडविणे

(D) वरील सर्व.

4. बालकांचे मूलभूत हक्क पुरविण्यासाठी भारताने केलेल्या महत्वाचे करार खालीलपैकी कोणते दर्शवितात ?

(A) बालमृत्यूचे प्रमाण कमी होणे

(B) जन्मदरात वाढ होणे

(C) भारत हे जगातील बालकामगारांच्या जास्तीत जास्त संख्येचे घर आहे

(D) भारतामध्ये 18 व्या वर्षापर्यंत 65% मुलींचे लग्न होते.

5. बालक हे चित्रफित, आकृती, P.P.T. प्रदर्शनाद्वारे आणि नमुनाद्वारे अध्ययन करण्यास उत्सुक असते वार्कच्या ( VARK ) अध्ययन पद्धत नमुन्यामध्ये बालक हे

(A) दृश्यीय अध्ययनकता (B) स्पर्श ज्ञान अध्ययनकर्ता

(C) श्राव्यिय अध्ययनकर्ता (D) वाचन आणि लेखन अध्ययनकर्ता.

6. बालक हे मातीपासून चित्र आणि खेळणी तयार करते. हे याचे उदाहरण आहे.

(A) शारीरिक खेळ (B) हस्तकौशल्य खेळ

(C) बोधक खेळ (D) चिह्नात्मक खेळ.

7. शाळकरीता गरीब मुलाना शेजारील खाजगी शाळेत दाखल करणे हा शाळेच्या या कारणासाठी सक्तीचे आहे.

(A) आपल्या शाळापद्धतीच्या शेवटच्या पदक्रमानुसार स्वरूप कमी करणे

(B) इंगलीश माध्यम शाळेमध्ये बालकाना अध्ययनास तयार करणे

(C) अध्ययनात विविधता आणणे

(D) खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे.

8. चिकित्सक बुद्धीमता ( आकलन शक्ती ) चा अर्थ हा आहे.

(A) नविन अनुभवांचा जुळवून घेणे

(B) संदर्भाशी जुळवून घेणे

(C) गूढ विचारांची क्षमता असणे

(D) गुतागुंतीच्या परिस्थितीशी जुळवून घेणे.

9. संपादन परीक्षेचे हे उदाहरण आहे.

(A) कादंबरीच्या स्वरूपातील नमने बनविणे (B) दस्तावेज ( Portfolios )

(C) नोंदवही (D) ऑलंपियाडस्.

10. 6 ते 14 वर्षापर्यंतच्या बालकाना शिक्षणाचा मूलभूत हक्क देणारा कायदा हा आहे.

(A) घटनेतील परिशिष्ट 7 क्रमांक 256 कलम

(B) 76 वा घटना दुरुस्ती कायदा

(C) 2009 चा शिक्षण हक्क कायदा

(D) 15 वे कलम.

**भाग - II**

खालील कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये : $5 \times 2 = 10$

11. शिक्षक झाल्यानंतर स्वतःची सुधारणा आणि संघर्ष करुन स्वतःला व्यावसायिक शिक्षक कसे बनवाल ?

12. वेगवेगळ्या कुटुंब पद्धतीशी जोडलेली बालके इतरांच्याशी कशा प्रकारे संवाद वेगवेगळ्या प्रकारे राखतात ? स्पष्टीकरण करा.

13. स्वमौल्यमापनाचे महत्व कोणते ?

14. बहुश्रेणीत अध्यापनाची चार तत्वे लिहा.

15. प्रतिभावंत बालकाच्या चार गुणधर्मांची यादी करा.

16. समावेशक पाठयोजना तयार करताना ध्यानात ठेवावे लागणारे चार घटक लिहा.

17. राखीवता धोरणाच्या कोणत्याही दोन फायद्यांचे वर्णन करा.

18. अभ्यास क्रमाचे कोणतेही दोन उपयोग लिहा.

**भाग - III**

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्याय प्रश्न आहेत. त्यापैकी (a) किंवा (b) चे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा जास्त असू नये : $8 \times 5 = 40$

19. a) ओळखीमध्ये एकाच वेळी दोन आंतरिक मानवी प्रेरणा असतात – संबंधाची गरज आणि अद्वितीयतेची गरज. विधानाचे स्पष्टीकरण करा.

**किंवा**

b) शिक्षक-विद्यार्थी संबंध हा शाळा परिसर सामाजिकी करण्याची अत्यंत महत्वाचा घटक आहे. या विधानाचे स्पष्टीकरण लिहा.

20. a) विविधता ही एक समावेशक वर्गखोलीतील समस्या न मानता संपन्मूल म्हणून त्याचा वापर झाला पाहिजे. तुमचे उत्तर उदाहरणासहीत स्पष्ट करा.

**किंवा**

b) तुम्ही एक शिक्षक म्हणून प्रतिभावंत बालकासाठी शिक्षण अति समावेशात्मक कसे कराल ? तुमचे उत्तर स्पष्ट करा.

21. a) तरूणावस्था हा काळ ताण आणि वादळाचा असतो. स्पष्ट करा.

**किंवा**

b) अध्ययन एक प्रक्रिया तसेच एक उत्पादन ( फळ) ) आहे. स्पष्ट करा.

22. a) तुम्हो तुमच्या वर्गामध्ये मुलामुलींच्या मध्ये लिंग संवेदनशीलतेचा विकास कसा कराल ? पाच उपायांची यादी करा.

**किंवा**

b) समावेशातील शारीरिक अडथळे दूर करण्याकरीता तुम्ही वापरलेल्या कोणत्याही पाच उपायांची यादी करा.

23. a) वेगवेगळ्या अध्ययन कर्त्याचा वेगवेगळा अध्ययन वेग असतो. या प्रसंगातील काळजी पूर्वक योजनेच्या भूमिकेचे मौल्यमापन करा.

**किंवा**

b) मुलांच्यामध्ये विविध प्रकारच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यात खेळाच्या भूमिकेचे मौल्यमापन करा.

24. a) नागरिकांची कोणतेही दोन मूलभूत कर्तव्ये लिहा. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये या कर्तव्यांची जाण कशी करून द्याल ?

**किंवा**

b) शिक्षक या नात्याने तुम्ही समतावादी मुल्यांचा सराब करणारी वर्गखोली कशी निर्माण कराल ?

25. a) शाळा ही एक प्रत्येक बालकाला शैक्षणिक अनुभवांची रचना पुरविणारी औपचारिक पद्धत आहे. या विधानाचे स्पष्टीकरण लिहा.

**किंवा**

b) शिक्षक हा शाळा प्रक्रिया आणि परिवर्तनशील सरावाची गरज असणारा अत्यंत निर्णायक संबंध आहे.

26. a) शिक्षणामध्ये समाजशास्त्राची व्याप्ती असलेले पाच घटक स्पष्ट करा.

**किंवा**

b) अध्ययन ही एक पायाभूत सामाजिक पद्धत आहे. स्पष्ट करा.